**SNDT WOMEN'S UNIVERSITY**
**MUMBAI**

# <u>*शतकोत्तर स्थापनादिन समारंभ*</u>

## वृत्त प्रकाशन

दिनांक ५ जूलै, २०१७ रोजी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) महिला विद्यापीठाचा १०१ वा शतकोत्तर स्थापनादिन समारंभ चर्चगेट येथील सर सीताराम तथा लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृहात सकाळी ११.०० वाजता संपन्न झाला. यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. शशिकला वंजारी यांनी त्यांच्या स्वागतपर भाषणामध्ये विद्यापीठाच्या कार्याचा आढावा घेतला. श्री विठठ्लदास ठाकरसी यांच्या दातृत्वाचा गौरवशाली उलेख करून त्यांनी ''भाऊबीज निधी'' योजनेची माहिति दिली. सर विठठ्लदास ठाकरसी यांच्या स्मरणार्थ २०१७–१८ या वर्षासाठी हा उपक्रम राबविला जाईल. यासाठी धनादेशाव्दारे रू २५,०००/– ची देणगी देण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

या समारंभाचे सन्माननीय अतिथी श्री. सुधीर ठाकरसी (अध्यक्ष, हिंदुस्थान मिल्स लि.) यांनी विद्यापीठाच्या भाऊबीज योजनेसाठी विठठ्लादास ठाकरसी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे रू. १० लाख देणगी जाहिर केली.

या समारंभाचे सन्माननीय प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे शिक्षण, क्रिडा, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री माननीय श्री. विनोद तावडे यांनी त्यांच्या मनोगतामध्ये विद्यापीठाने २५ विद्यार्थीनींना शासकीय योजनांमध्ये कार्यानुभवासाठी पाठविण्याचे आवाहन केले. विद्यापीठाच्या समस्या सोडविण्यासाठीचे आश्वासन देतांनाच त्यांनी १०० वर्षानंतरची सक्षम महिला कशी असेल याचा विचार करून विद्यापीठाने आताचे अभ्यासक्रम तयार करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

या समारंभात उत्कृष्ट महाविद्यालय – बी.एम. नानावटी महिला महाविद्यालय, उत्कृष्ट शिक्षक – डॉ. जगमीत मदान, प्राध्यापक, एसव्हीटी कॉलेज ऑफ होम सायन्स, उत्कृष्ट शिक्षक – डॉ. स्मृती भोसले, प्राध्यापक, एल.जे.एन.जे. महिला महाविद्यालय, उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी – श्रीमती पी. ईश्वरन, एम. डी. शहा महिला महाविद्यालय आणि सात माजी विद्यार्थीनींचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सांगता विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. संजय नारायण भांरबे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.